MHKO110002242016

# नियमित दिवाणी दावा क्र.२६/२०१६.

(CNR No.**MHKO110002242016**)

## निशाणी क्रमांक १७८ खालील आदेश

( बालेचांद मणेर वि. द्रौपदी बुरुड व इतर )

प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल करून **निशाणी क्र.१७४** प्रमाणे, वादी व त्यांच्या विधिज्ञांनी न्यायालयावर दबाव टाकण्याचा प्रयत्न केल्याबाबत त्यांच्यावर कार्यवाही होण्यासाठी मा. उच्च न्यायालय यांना कागदपत्रे पाठविण्याची विनंती केली आहे.

०२. प्रतिवादी यांच्या कथनांनुसार, वादी यांनी प्रस्तुतचा दावा त्यांच्या विरोधात कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. सदर कामी वादी यांचा **निशाणी क्र.०५** चा अर्ज मंजूर करण्यात आलेला आहे. अशी वस्तुस्थिती असताना, वादी यांनी निशाणी क्र.१२७ वर दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ नुसार अर्ज दाखल करून प्रतिवादी व इतर लोकांच्या विरोधात वडगांव पोलीस ठाण्यात पोलीस संरक्षण मिळण्याबाबत अर्ज सादर केला. सदरचा **निशाणी क्र.१२७** वरील अर्ज हा अंतिम चौकशीनंतर दिनांक ०५/०४/२०२२ रोजी फेटाळण्यात आला व प्रकरणाची पुढील तारीख २९/०४/२०२२ अशी ठेवण्यात आली. त्यानंतर, दिनांक २९/०४/२०२२ रोजी वादीचे विधिज्ञ यांनी **निशाणी क्र.१७४** नुसार पुरसीस दाखल केली व सदर पुरसीसद्वारे न्यायालयाची बदनामी करण्याच्या उद्देशाने व स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठी न्यायालयावर अनेक खोटे आरोप केले आहेत. तसेच, विधिज्ञ बारमध्ये त्याची तोंडी चर्चा करून न्यायालयाची बेइज्ञती करण्याचा प्रयत्न केला आहे. सबब, प्रतिवादी यांनी वादी व त्यांच्या विधिज्ञांची चौकशी होण्याबाबत आदेश पारित करण्याची विनंती केली आहे.

०३. वादी यांनी **निशाणी क्र.१९३** वर प्रस्तुत अर्जासाठीचे त्यांचे म्हणणे दाखल करून सदर अर्जामधील सर्व मजकूर नाकारलेला आहे. वादी यांच्या म्हणण्यानुसार, प्रस्तुत दाव्यातील **निशाणी क्र.०५** वरील आदेशाविरुद्ध प्रतिवादी यांनी कोणतेही अपील दाखल केलेल नाही. याउलट, मनाईचा आदेश असताना देखील प्रतिवादी यांनी दांडगाव्याने दावा मिळकतीमध्ये घुसखोरी केल्यामुळे वादी यांनी त्यांच्या विरोधात न्यायालयाच्या आदेशाचा

अवमान केल्याबाबत अर्ज दाखल केला असून तो न्यायालयासमोर प्रलंबित आहे. तसेच पोलीस संरक्षणाबाबत देखील वादी यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडे अर्ज दाखल केला असून तो न्यायप्रविष्ट आहे. केवळ वादी यांची दावा मिळकत दिर्घकाळ उपभोगता यावी व सदरचे प्रकरण प्रलंबित ठेवता यावे यासाठी प्रतिवादी यांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. तसेच, दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ मधील तरतुदी सदर अर्जास लागू होत नाहीत. सबब या सर्व कारणांसाठी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती वादी यांनी केलेली आहे.

०४. प्रस्तूतचा अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले.

०५. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांचा मुख्य आक्षेप हा **निशाणी क्र.१७४** वरील पुरसीस असून त्या अन्वये संबंधीत विधिज्ञ व वादी बालेचांद इब्राहिम मणेर यांची चौकशी होऊन योग्य तो आदेश होण्याबाबत अर्ज सादर केल्याचे दिसून येते. अभिलेखावरून, दिनांक ०६/०७/२०२५ रोजी वादी बालेचांद मणेर यांचे निधन झाल्याचे **निशाणी क्र.२३६** वरील मृत्यू प्रमाणपत्रावरून दिसून येते. तसेच, **निशाणी क्र.१७४** वरील पुरसीसचे अवलोकन केले असता, सदर पुरसीस दिनांक २९/०४/२०२२ रोजी दाखल होऊन त्यावर, तत्कालीन पीठासीन अधिकारी यांनी दिनांक २९/०४/२०२२ रोजी कारणमिमांसा देत आदेश केल्याचे देखील अवलोकित होते. त्यामुळे, संबंधीत तत्कालीन पीठासीन अधिकारी यांनी त्याबाबत आदेश केलेला असल्यामुळे पुन्हा त्या अनुषंगाने अर्ज हा विचारात घेता येणार नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रस्तुतच्या अर्जामध्ये कोणतीही गुणवत्ता नसल्याचे दिसून येते. सबब तो फेटाळण्यास पात्र राहातो. करिता मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्ज नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2026.01.17 17:44:52 +0530

**( श्रीनिवास अ. कुलकर्णी )**

दिनांक. १७/०१/२०२६. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पेठ-वडगांव.